# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४०८/२०१९

**तक्रारकर्ता डॉ. मोहन कोंडीबा पाटील**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (मावक)**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव(मावक)**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०६.११.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २४.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. १३४८/२०१८ रा.मा.आ.अपील क्र. ४१०/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०६.०८.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-
"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना उपलब्ध माहिती १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. २६.०८.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. १६.०९.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. ०७.१०.२०१९ आयोगास सादर केला. जन माहिती अधिकारी यांनी अहवालात नमुद केले की, आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना दि. २३.०९.२०१९ रोजी माहिती दिली आहे. तसेच, तक्रारकर्ता यांना दिलेल्या माहितीची प्रत जोडून आयोगास अहवाल सादर केला होता.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.२८.१०.२०२४ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास निवेदन केले की, आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना दि. २३.०९.२०१९ रोजी माहिती दिलेली आहे व त्याबाबतचा अहवाल आयोगास दि. ०७.१०.२०१९ सादर केलेला आहे.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०७.११.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**